ज्ञान प्रबोधिनीचे, कुमारांसाठी कृतिशीलता जोपासणारे मासिक

निव्वळ मासिक नव्हे !...

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

# छात्र प्रबोधन

प्रारंभ शके १९१४/इ.स. १९९२

३२ व्या वर्षात पदार्पण







छात्र प्रबोधन मासिक/द्वैमासिक/दिवाळी विशेषांक व अंकातील साहित्यातून प्रकाशित झालेली पुस्तकांची निवडक मुखपृष्ठे







# ‘छात्र प्रबोधन’ मासिके, दिवाळी अंक, प्रकाशने व उपक्रमांसाठी

# देणगीदारांना आवाहन पत्र

## छात्र प्रबोधन दिवाळी अंकात देणगी देण्याबाबतचे आवाहन पत्र

**मान्यवर**
**सस्नेह नमस्कार**

कुमारांमध्ये (वय वर्षे १३ ते १७) वाचनाची गोडी वाढावी, साहित्याची अभिरुची वाढावी, स्वयंविकासाची प्रेरणा आणि राष्ट्रीयत्वाची जाणीव वाढावी या उद्देशाने ज्ञान प्रबोधिनीचे 'छात्र प्रबोधन' मासिक हे गेली ३२ वर्षे सातत्याने प्रकाशित होत आहे.

नित्य मासिकाबरोबर ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सुबोध द्वैमासिक अंक व इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी द्वैमासिक अंकही प्रकाशित केले जातात. या तीनही नियतकालिकांचे तीन दर्जेदार दिवाळी विशेषांक, कुमारांसाठी दिनदर्शिका, अंकाच्या साहित्यातून ६० पेक्षा अधिक पुस्तके व १ पानी, ६ पानी प्रत्येकी ४० पुस्तकांचे ५ संच प्रकाशित झाले आहेत.

या साहित्य निर्मितीसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कुमार साहित्य मेळावे, लेखन-संपादन कार्यशाळा, कुमार साहित्य संमेलने, हस्तलिखित-अभिवाचन स्पर्धा, वर्गोद्दिष्ट स्पर्धा इ. उपक्रम राबविले जातात. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्साहवर्धक प्रतिसाद असतो.

मासिक व उपक्रमांद्वारा गेल्या ३२ वर्षात काही लाख विद्यार्थ्यांपर्यंत आम्ही पोहोचू शकलो याचा आनंद व समाधान आहे. ही चळवळ महाराष्ट्रात व भारतात अन्य राज्यांमध्ये लाखो विद्यार्थ्यांपर्यंत सर्वदूर पोहोचावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

गेल्या १५ महिन्यांच्या वाटचालीचा आढावा व ह्या वर्षीचे संकल्प शेवटच्या पानावरील क्यू आर कोड द्वारे आपण वाचू शकाल. त्याबद्दलचा प्रतिसाद व चालू वर्षातील कामाबाबतच्या आपल्या सूचना व त्यातील सहभाग यांचे स्वागत आहे.

**या ही वर्षी हजारो विद्यार्थ्यांपर्यंत विकासाची ही चळवळ आम्ही पोहोचवू इच्छित आहोत, त्यासाठी आपण भरघोस अर्थसाहाय्य करावे व त्याद्वारे आमच्या प्रयत्नांना पाठिंबा द्यावा ही विनंती. कृपया आपली संमती व देणगीची रक्कम २८ सप्टेंबरपूर्वी कळवावी ही विनंती.**

**धन्यवादपूर्वक सस्नेह आपले,**

| अपर्णा घाटे | रूपाली बापट | शिल्पा कुलकर्णी | महेन्द्र सेठिया |
|---|---|---|---|
| (अर्थसंकलन समन्वयक) | (व्यवस्थापकीय समन्वयक) | (कार्यकारी संपादक) | (संपादक) |
| (८०८७२६१५१७) | (९४२२९१०९३७) | (९८८१७४४४०६) | (९४०४२२४७०५) |

टीप : २७ जानेवारी २०२४ पासून माझ्याकडे ज्ञान प्रबोधिनी संस्थेचा कार्यवाह म्हणून नवीन जबाबदारी आली आहे. यापुढे छात्र प्रबोधनचे दैनंदिन काम, एक तपाहून अधिक काळ छात्र प्रबोधनमध्ये कार्यरत असलेल्या शिल्पाताई कुलकर्णी (संपादकीय समन्वयक/साहाय्यक विभाग प्रमुख) व रूपालीताई बापट (व्यवस्थापकीय समन्वयक) या समर्थपणे सांभाळतील. तुमचा त्यांनाही भरघोस पाठिंबा मिळावा. छात्र प्रबोधनचे कार्य त्या निश्चितच वर्धिष्णू करतील असा विश्वास बाळगावा. त्याकडे माझेही लक्ष असेलच. ... महेंद्र सेठिया

## आपण छात्र प्रबोधनसाठी सर्वसाधारण देणगी अथवा पुढील योजनांसाठी सशर्त देणगी देऊ शकाल.

१. **वर्ग ग्रंथालय योजना** – एका वर्गाला ५० अंकांचा संच, १० शाळांमधील प्रत्येकी एका वर्गासाठी – एकूण ५०० विद्यार्थ्यांसाठी **देणगी रु. ५,०००/–**

२. **सुट्टीत घरोघरी ग्रंथालय योजना** – २५ ग्रंथालये प्रत्येकी २० पुस्तकांचा संच, एकूण सहभागी विद्यार्थी – ५०० **देणगी रु. १०,०००/–**

३. **३ तासांचे कुमार साहित्य मेळावे** – ५ मेळावे २५० विद्यार्थ्यांकरिता **देणगी रु. १५,०००/–**

४. **प्रबोधन दूत योजना** – १० शाळांसाठी वर्षभरासाठी प्रत्येकी रु. २५०० चे शैक्षणिक साहित्य व मासिक झूम बैठका **देणगी रु.२५,०००/–**

५. **कोणतेही पुस्तक १० रु. मध्ये** – पुढील प्रकाशने विशेष सवलतीत १० रु. किंमतीत देण्यासाठी देणगी (२००० प्रती प्रत्येकी)
**१. गीता गीताई  २. हरित संदेश  ३. असे घटते सुंदर अक्षर**
**(प्रत्येक पुस्तकासाठी) देणगी रु. ३०,०००/–**

६. **छात्र प्रबोधन मासिकासाठी** – मासिकाच्या एका महिन्याच्या कागद व छपाईसाठीचा खर्च (२००० अंक) **देणगी रु. ४०,०००/–**

## छात्र प्रबोधन मासिक, दिवाळी अंक, दिनदर्शिकेसाठी आपण देणगी देऊ शकता.

| अंक | देणगी रक्कम |
|---|---|
| १. छात्र प्रबोधन मासिक – वार्षिक देणगी | ₹ ७०००/– |
| २. कुमारांसाठी दिनदर्शिका | ₹ ६०००/– |
| ३. तीनही दिवाळी अंक | ₹ ३५००/– |
| ४. नित्य दिवाळी अंक | ₹ २०००/– |
| ५. इंग्रजी दिवाळी अंक | ₹ १०००/– |
| ६. सुबोध दिवाळी अंक | ₹ १०००/– |

### रक्कम जमा करण्यासाठी छात्र प्रबोधन बँक खात्याचे तपशील

Account name - **Jnana Prabodhini**
Bank Name - **Bank of India**
Accout No. - **051510110004917**
Branch - **Shanipar Branch**
IFSC Code - **BKID0000515**

देणगीवर 80G अंतर्गत ५०% आयकर सवलत मिळेल.

**मुख्य कार्यालय :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३० **दूरभाष :** (०२०) २४२०७१७४/१७५, **संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org **ऑनलाइन खरेदीसाठी :** www.jpprakashane.org

**मासिकाची वर्गणी : वार्षिक :** ₹ २५०/–; **द्वैवार्षिक :** ₹ ५००/–; **त्रैवार्षिक :** ₹ ७००/–; दशवार्षिक : ₹ २२००/–




## शके १९४५ – ४६ / इ.स. २०२३ – २४ वर्षातील ठळक घडामोडी

- छात्र प्रबोधनचे नित्य अंक, सुबोध द्वैमासिक अंक व इंग्रजी द्वैमासिक अंक नियमितपणे प्रकाशित. (एकूण ४००० सभासद) तीन दिवाळी अंक (२७,००० अंक वितरित), दिनदर्शिका (८००० प्रती वितरित) आणि १५ पुस्तके प्रकाशित.
- पुणे व परिसरात २९ साहित्य मेळावे. हरंगुळ–लातुर व हराळी येथे २५ साहित्य मेळावे व दोन्ही ठिकाणी झालेली कुमार साहित्य संमेलने यांमधून ३,००० विद्यार्थी सहभागी
- सुमारे १५० शिक्षकांसाठी व त्यांच्याद्वारा १०,००० विद्यार्थ्यांसाठी प्रबोधन दूत योजना
- वर्गोद्दिष्ट स्पर्धा, हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धा यांमधून १,००० विद्यार्थी सहभागी.
- मे महिन्याच्या सुट्टीतील प्रबोधन ऐपावाक (ऐका–पाहा–वाचा–करा) हा ऑनलाइन उपक्रम, २०० ठिकाणी विद्यार्थ्यांद्वारा सुट्टीतील ग्रंथालये व जोडीकार्य उपक्रम यांद्वारे २,५०० विद्यार्थी सहभागी

**या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय व उत्साहवर्धक प्रतिसाद होता**

सौर चैत्र शके १९४५ ते सौर आषाढ १९४६ (एप्रिल २०२३ ते जून २०२४) या कालावधीतील वृत्त व शके १९४६–४७/इ.स.२०२४–२५ या वर्षीचे ठळक संकल्पही बाजूच्या क्यू आर कोड द्वारे आपण वाचू शकाल.

आढावा व संकल्प वाचण्यासाठी येथे क्लिक करा